# रखडलेल्या ‘झोपु’च्या अभय योजनेला मंजुरी

## ३८० योजना मार्गी लावण्यासाठी निर्णय

निशांत सरवणकर, लोकसत्ता

**मुंबई :** गेली अनेक वर्षे रखडलेल्या सुमारे ३८० झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्यासाठी प्राधिकरणाने तयार केलेल्या विकासकांसाठी असलेल्या अभय योजनेला मुख्यमंत्र्यांनी अखेर मान्यता दिली आहे. याबाबतचा आदेश लवकरच काढला जाईल, असे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी शिवशाही पुनर्विकास कंपनी तसेच स्टेट बँक ऑफ इंडियामार्फत वित्तपुरवठा करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर झोपु प्राधिकरणाने अभय योजना तयार केली. रखडेल्या योजनांत निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व म्हाडा यांच्या संयुक्त भागीदारी अंतर्गत योजना, शासकीय भूखंड क श्रेणीत रुपांतरित करण्याची मुभा देणे व अभय योजना असे चार प्रस्ताव रखडलेल्या झोपु योजनांच्या पुनरुज्जीवनासाठी असल्याचे वृत्त ‘लोकसत्ता’ने सर्वप्रथम दिले होते. मुख्यमंत्र्यांनी त्यास मंजुरी दिल्याने आता या योजना मार्गी लागतील, असा विश्वासही आव्हाड यांनी व्यक्त केला.


झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये विविध वित्तीय संस्थांकडून गुंतवणूक केली जाते. या योजनेत उपलब्ध होणाऱ्या विक्री घटकाचे अधिकार या बदल्यात या वित्तीय संस्थांना मिळतात. मात्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अभिलेखात या वित्तीय संस्थांचा उल्लेख नसतो. झोपु योजना रखडली की त्याचा फटका विक्री घटकांनाही बसतो. त्यामुळे अनेक वित्तीय संस्थांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. वित्तपुरवठा होऊनही विकासकांकडून झोपडीधारकांना भाडे दिले जात नाही वा पुनर्वसनाच्या इमारतीही उभारल्या जात नाहीत. या योजना पूर्ण करण्याची कुवत या वित्तीय संस्थांमध्ये आहे. या वित्तीय संस्थांनाच विकासकाचे अधिकार दिले जाणार आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया वा सेबीने मान्यता दिलेल्या वित्तीय संस्थांनाही झोपु योजनेत विकासक बनता येणार आहे. या योजना विविध वित्तीय संस्थांना पूर्ण करण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी देण्यात येणार असून या काळात संबंधित विकासकाला योजनेत अभय मिळणार आहे.

### रखडलेल्या योजना

- अर्थपुरवठा अनुपलब्ध वा इतर कारणांमुळे : २३०, १३ (२) अन्वये कारवाई केलेल्या योजना : ५९
- अंतर्गत कलहामुळे : ३३
- न्यायालयीन आदेशांमुळे : ११
- सीआरझेड दोन : १३
- नागरी हवाई वाहतूक प्राधिकरण : ४
- केंद्रीय पर्यावरण मंत्रालय : ४
- संरक्षण विभाग : ६
- सक्तवसुली महासंचालनाकडील चौकशी : २०

### योजना काय आहे?

- अर्थपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थेची सहविकासक किंवा वित्त पुरवठाधारक अशी इरादापत्रात नोंद
- तीन वर्षांत योजना पूर्ण होईपर्यंत विकासकाला काढून टाकण्याच्या (झोपु कायदा कलम १३(२)) प्रक्रियेला स्थगिती
- वित्तीय संस्थेची नियुक्ती करताना झोपडीधारकांच्या संमतीला फाटा
- वित्तीय संस्थेने पुनर्वसन घटकाचे काम विहित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक, अन्यथा दंड
- झोपडीधारकांना वेळेत भाडे देण्याची जबाबदारी वित्तीय संस्थांची
- वित्तीय संस्थेने काम पूर्ण न केल्यास विकासकावर कारवाई









विन्टेज अँड क्लासिक कार क्लब ऑफ इंडियाच्या (व्हीसीसीसीआय) वतीने रविवारी ‘विन्टेज कार फिस्टा ड्राइव्ह’चे आयोजन करण्यात आले होते. कफ परेड येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरजवळ झालेल्या या कार्यक्रमात देशभरातील विविध दुर्मीळ कार आणि मोटारसायकली सहभागी झाल्या होत्या. पर्यटन व पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने (एमटीडीसी) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# पालिका शाळांतील मुलांना आर्थिक साक्षरतेचे धडे

## मुंबई शेअर बाजारच्या सहकार्याने उपक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील गरीब घरांतील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा भविष्यात आर्थिक स्तर उंचावला जावा, यासाठी ‘आर्थिक साक्षरता मिशन’ अंतर्गत शालेय जीवनातच इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे देण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे. मुंबई शेअर बाजाराच्या सहकार्याने हा उपक्रम राबवला जाणार आहे. यासाठी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या महानगरपालिका आणि बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिट्यूट लि. दरम्यान सामंजस्य करार होणार आहे.

सर्वसामान्य गटातील पालकांचा व देशामध्ये मुंबईचा आर्थिक स्तर उंचावला जावा याकरिता ‘आर्थिक साक्षरता मिशन’ अंतर्गत पालिकेने हा उपक्रम आखला आहे. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिट्यूट लि. च्या सहकार्याने महानगरपालिकेच्या इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरतेचे धडे देण्याकरिता अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे. त्याची पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन व आर्थिक साक्षरता मिशनचा शुभारंभ देखील सोमवारी होणाऱ्या कार्यक्रमादरम्यान होणार आहे.

या कार्यक्रमाला पालिकेचे सहआयुक्त अजीत कुंभार, बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक कुमार चौहान, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज ( BSE) इन्स्टिट्यूट लि. चे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अंबरीष दत्ता या मान्यवरांसह शिक्षण विभागातील अधिकारी वर्ग उपस्थित राहणार आहे.

### शिक्षकांना प्रशिक्षण

या अभ्यासक्रमासाठी पालिकेच्या शाळांमधील १०० शिक्षकांना प्रशिक्षित केले जाणार आहे. या सर्व शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना येत्या जूनमध्ये सुरू होणाऱ्या नवीन शैक्षणिक वर्षापासून आर्थिक साक्षरतेचे धडे मिळणार आहेत.



# मुंबईत करोनाचे ३५ नवे रुग्ण



**मुंबई :** मुंबईतील दैनंदिन करोना रुग्णांची संख्या गेल्या काही दिवसांपासून ३० ते ५० च्या मध्ये स्थिरावली आहे. उपचाराधीन रुग्णांची संख्याही तीनशेच्या आसपास स्थिरावली आहे. रविवारी ३५ नवीन रुग्णांची नोंद झाली तर ३५ रुग्ण करोनामुक्त झाले. मृतांची संख्या शून्य आहे. बाधित झालेल्यांची एकूण संख्या १० लाख ५८ हजारावर गेली आहे. रविवारी दिवसभरात ३५ रुग्ण करोनामुक्त झाले. करोनामुक्त रुग्णांचे प्रमाण ९८ टक्क्यांवर स्थिरावले आहे. तर रुग्णवाढीचा दर ०.००४ टक्के आहे. तर रुग्णदुपटीचा कालावधी सोळा हजार दिवसांच्यापुढे गेला आहे. मुंबईतील चाचण्यांचे प्रमाण कमी होत असून शनिवारी दिवसाला ८,१७३ चाचण्या करण्यात आल्या. मुंबईतील करोना रुग्णांसाठीच्या एकूण रुग्णशय्यांपैकी केवळ ०.०८ टक्के खाटा व्यापलेल्या आहेत. म्हणजेच सध्या २६ हजार खाटांपैकी केवळ २० खाटा व्यापलेल्या आहेत.

**राज्यात ९० नवे रुग्ण**

राज्यात रविवारी करोनाचे ९० नवे रुग्ण आढळले, तर शून्य मृत्यूची नोंद झाली आहे. रविवारी ११५ रुग्ण करोनामुक्त झाले. सध्या राज्यात ७७८ रुग्ण उपचाराधीन आहेत.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यास सश्रम कारावास

**कल्याण :** येथील एका महिलेच्या घरात जाऊन तिच्या सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या ४९ वर्षांच्या आरोपीला कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक विशेष न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश संगीता पहाडे यांनी सहा वर्षे ११ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. गोविंद जाधव असे आरोपीचे नाव आहे. अल्पवयीन मुलीचे कुटुंब आणि आरोपी जाधव हे शेजारी राहतात. घरात कोणी नसताना गोविंद याने आपल्या घरात येऊन अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केले, अशी तक्रार या मुलीच्या कुटुंबीयांनी बाजारपेठ पोलीस ठाण्यात केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी गोविंद जाधवविरोधात बालकांच्या लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याने (पॉक्सो) गुन्हा दाखल केला होता.

# संघाकडून समाजात धार्मिक द्वेषाचे बीज

(पान १ वरून) यांच्यातील युद्ध प्रकट नसले तरी ते मानसिक पातळीवर होते आणि गेले एक शतकभर त्याला खतपाणी घालण्यात आले. धार्मिक द्वेष रुजवला गेला. तो पुढचे ६० ते ७० वर्षे राहणार आहे. यासंदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जणूकाही शतकाची रणनीती आखली असावी, असे वाटते. त्यांनी स्वातंत्र्य लढा आणि इतर कोणत्याही आंदोलनात भाग घेतला नाही. या काळात ते माणसांची मने घडवण्याचे काम करीत होते.’’

‘‘भाजपला १९८४ मध्ये लोकसभेत केवळ दोन जागा होत्या. बाबरी मशीद पाडणे, अयोध्येत राममंदिर बांधण्यासाठी रथयात्रा काढणे या मुद्द्यावरून देशात राजकीय परिवर्तन घडले. त्याचा फायदा भाजपला झाला व लोकसभेतील त्यांचे संख्याबळ वाढले. आज भारतात काय घडते आहे, हे सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. धार्मिक द्वेषभावना इतक्या खोलवर रुजवली गेली की, प्रत्येकाच्या मनामध्ये जगाचे दोन गटच पडले. याचा सर्वाधिक परिणाम तरुणांवर होत आहे. बालमनावर रुजवलेले द्वेषाचे बीज ही पिढी संपल्यावरच संपेल’’, असे डॉ.बंग म्हणाले.

महाराष्ट्र शासन
**जलसंपदा विभाग**
**राज्य प्रकल्प संनियंत्रण कक्ष**
**जागतिक बँक अर्थसाहाय्यित राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प**
**मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान**
**जलविज्ञान भवन, दिंडोरी रोड, नाशिक-४२२००४**
**ई-निविदा सूचना १३ सन २०२१-२२**

१. नोडल अधिकारी, राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प एवं मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक इनकी तरफ से कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, नागपूर यह जागतिक बँक अर्थसाहाय्यित राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प का काम करने हेतु महाराष्ट्र राज्य अंतर्गत **"SCADA System for Reservoir Operation of Gosikhurd Dam in Godavari Basin including O & M for 5 Years"** इस काम की निविदा सूचना प्रसिद्ध कर रहे है.

२. इस निविदा के बारे में काम का ब्योरा तथा Technical Specifications इ. ब्योरा **https://mahatenders.gov.in, www.wrd.maharashtra.gov.in** एवंम www.mahahp.gov.in इन वेबसाइट पे तिथी ११.०४.२०२२ समय ११.०० से निविदा विक्री अंतिम तिथी ११.०५.२०२२ समय १५.०० तक उपलब्ध रहेगी.

स्वाक्षरी/-
**कार्यकारी अभियंता,**
जलविज्ञान प्रकल्प विभाग,
**नागपूर, वैनगंगानगर, अजनी-४४०००३**
दूरध्वनी : ०७१२-२९८०१४६
e-mail : eehpdiv.nagpur@gmail.com

डीजीआयपीआर-२०२२-२३/११२

**SBI**
मानव संसाधन विभाग
स्टेट बँक भवन, १६वा मजला, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१
**प्रस्तावाची विनंती**
भारतीय स्टेट बँकेने आरएफपीमध्ये नमूद केल्यानुसार मानव संसाधन (एचआर) सल्लागार / सल्लागारांच्या नेमणुकीसाठी प्रस्तावाची विनंती (आरएफपी) जारी केली आहे. अधिक माहितीसाठी कृपया बँकेची वेबसाईट https://bank.sbi वरील ‘प्रोक्युरमेंट न्यूज’ येथे भेट द्या.

स्वाक्षरी/-
स्थान: मुंबई — उप महाव्यवस्थापक (सीएमडी)
दिनांक: ११.०४.२०२२ — मानव संसाधन विभाग, कॉर्पोरेट सेंटर मुंबई

**दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप. बँक लि; अकोला**
मुख्य कार्यालय,‘जनवैभव’ जुने कॉटन मार्केट,अकोला. फोन न.0724-2430241,2430639,2430012
**बँकेकरिता जागा पाहिजे**
बँकेच्या काळबादेवी, रोड मुंबई, शाखा कार्यालयाकरीता काळबादेवी परिसरात अंदाजे 800 ते 1500 स्के. फुटापर्यंत बांधलेली व्यावसायीक जागा विकत किंवा भाडयाने घेणे आहे. इच्छुक व्यक्तींनी सविस्तर विवरण व अटी, जागेचे अपेक्षित भाडे/ किंमत, मंजुर नकाशा, कलर फोटो, मोबाईल नंबर, ई-मेल अ‍ॅड्रेस इत्यादी संपुर्ण माहितीसह आपले अर्ज पाकिटात/ किंवा email द्वारे jagdish.prajapat@akolajanatabank.com यावर दि. 22/04/2022 पर्यन्त बँकेच्या मुख्य कार्यालयास पोहोचतील या बेताने पाठवावे.
**(विलासचंद्र अग्रवाल)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**pnb Housing Finance Limited**
नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली-११० ००१
बोर्ड नं. : +९१-११-२३७३६८५७, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय : २०३ व २०४-ए, दुसरा मजला, मागाथमा, वेस्टर्न एज-I, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६, वेबसाइट : www.pnbhousing.com

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**
**वित्तीय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या कलम १३(४) यासह वाचलेल्या परिशिष्ट-IV आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(२) यासह वाचलेल्या नियम ८(१) नुसार**

**लोन अकाऊन्ट नं. : डब्ल्यूएफएच/एमयूएच/०७१८/५५४७९६**

**ज्याअर्थी, ‘‘पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड’’चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी वित्तीय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा २००२ (‘‘कायदा’’) अंतर्गत आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ (‘‘सरफेसी कायदा, २००२’’) आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ३ यासह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत २८.०१.२०२२ रोजीप्रमाणे आयएनआर ६,९४,४३,१३२.२६/- (भारतीय रुपये सहा कोटी चौऱ्याण्णव लाख त्रेचाळीस हजार एकशे बत्तीस व पैसे सव्वीस फक्त) थकीत रक्कम असलेली उक्त मागणी सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणको म्हणजेच असोसिएशन ऑफ पर्सन्स (‘एओपी’ज), श्री. बिंदेश सोमय्या आणि श्री. मिलिंद सोमय्या; मिलिंद महेंद्र सोमय्या, योगिता मिलिंद सोमय्या, शीतल बिंदेश सोमय्या आणि बिंदेश महेंद्र सोमय्या यांच्यावर फर्माविणारी दिनांकित २८ जानेवारी, २०२२ सरफेसी कायदा, २००२च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली होती.**

वर नमूद केलेले ऋणको दिनांकित १५.०१.२०२२ कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार उक्त मागणी सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या समाप्तीनंतरसुद्धा रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत. या कारणास्तव, वर नमूद केलेले ऋणको व आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी आज दिनांक ०७ एप्रिल, २०२२ रोजी सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८ यासह वाचलेल्या सरफेसी कायदा, २००२च्या कलम १३च्या पोट-कलम (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा विधायक ताबा घेतला आहे.

विशेषकरून वर नमूद केलेल्या ऋणकोंना तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी उक्त मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार **वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत त्यानंतर उपार्जित आणि निघालेले आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह पूर्वोक्त रकमेवरील संविदात्मक दरातील पुढील व्याज आणि ३०.०३.२०२२ रोजीप्रमाणे नियत व देय असलेल्या आयएनआर ७,१४,८५,१११.२६/- (भारतीय रुपये सात कोटी चौदा लाख पंच्याऐंशी हजार एकशे अकरा व पैसे सव्वीस फक्त) या रकमेकरिता ‘‘पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड’’**च्या आकाराच्या विषयाधीन असेल.

**सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम १३च्या पोट-कलम (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.**

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

१) पुढील जमिनीचे सर्व खंड व तुकडे : मोजमापाची १५३.८७ चौ.मी., ५६७.१५ चौ.मी. यापैकी, १०८२.८७ चौ.मी. मोजमापाच्या जमिनीशी तुल्य जमिनीमधील २७.१३% अविभक्त हित आणि ७६, जकेरिया रोड, धारण केलेला सी.टी.एस. नं. ५३१, ५३१ (१ ते १५) आणि ५६२ (१ ते ११), व्हिलेज मालाड दक्षिण येथे स्थित विक्री न झालेल्या युनिट्ससह बिल्डिंग ‘‘ॲरिस्टो क्लासिक’’च्या विंग ‘ए’ व विंग ‘बी’वरील भावी बांधकाम व शहर मर्यादेत असलेल्या मालाड पश्चिम मोजमापाची ३९९१.४० चौ.मी. आणि त्यातील सद्य व भावी एफएसआय यासह एकत्रित नोंदणी जिल्हा, मुंबई. विक्री न झालेल्या युनिट्सचा तपशील खालील तालिका क्र. १ मध्ये देण्यात आला आहे.


२) असलेली मालमत्ता फ्लॅट नं. ४०१, ४थ्या मजल्यावरील, मोजमापाचा ९७.८५ चौ.मी. विंग ‘ए’मधील (‘फ्लॅट’) ‘वास्तू टॉवर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड’ नावाच्या ‘वास्तू टॉवर’ म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील व येथे स्थित: सीटीएस ३०७/१०, ११ व १२, व्हिलेज वल्नाई, ता. बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा, एव्हरशाइन नगर, मालाड (प), मुंबई-४०० ०६४.

३) असलेली मालमत्ता फ्लॅट नं. ४०२, ४थ्या मजल्यावरील, मोजमापाचा ९७.८५ चौ.मी. विंग ‘ए’मधील (‘फ्लॅट’) ‘वास्तू टॉवर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड’ नावाच्या ‘वास्तू टॉवर’ म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील व येथे स्थित: सीटीएस ३०७/१०, ११ व १२, व्हिलेज वल्नाई, ता. बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा, एव्हरशाइन नगर, मालाड (प), मुंबई-४०० ०६४.

(वरील युनिट्स व फ्लॅट्सचा सर्व सविस्तर माहिती व तपशील आणि प्रवर्गसुद्धा पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वेबसाइटवर म्हणजेच www.pnbhousing.com यावर अपलोड करण्यात आलेले आहे आणि सुरक्षित मत्तेवरसुद्धा चिकटवले आहे.)

**श्री. प्रथमेश लोके**
**प्राधिकृत अधिकारी,**
**पीएनबी हाउसिंग फायनान्स लि.करिता**
**स्थळ : मुंबई**
**तारीख : ०७.०४.२०२२**

75 स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



"आम्ही एक असा समाज बनवत आहोत, जो समानता आणि सामाजिक न्यायाच्या पायावर दृढपणे उभा असेल"
-नरेंद्र मोदी, पंतप्रधान



**14 कोटी पेक्षा अधिक ईएसआय लाभार्थी**

**देत आहोत देशाला आत्मनिर्भर बनण्याची शक्ती**

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवादरम्यान विमाधारक कामगार आणि कुटुंबांसाठी उचललेली नवीन पाऊले**

- देशाच्या 15 शहरांमध्ये- पटना, अलवर, जयपूर, बेंगलुरू, चेन्नई, अहमदाबाद, वाराणसी, इंदूर, कोल्लम, पुणे, दिल्ली, गुवाहाटी, फरीदाबाद, कोलकाता तसेच हैदराबाद या शहरांमधील औद्योगिक क्लस्टरमध्ये विमाधारक कामगारांसाठी आरोग्य तपासणी कार्यक्रम.
- कामगार आणि लाभार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण आणि दाव्यांच्या निराकरणासाठी विशेष मोहिम.

**या विशेष मोहिमेचा आणि आरोग्य तपासणी कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी तुमच्या जवळच्या ईएसआयसी कार्यालय/इस्पितळाशी संपर्क साधा**

कामगार आणि रोजगार मंत्रालय भारत सरकार
कर्मचारी राज्य विमा महामंडळ

अधिक माहितीसाठी टोल फ्री नंबर 1800-11-2526 वर कॉल करा